सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ३१ डिसेंबर २०२५

आतील पानावर
पान २– वर्ष सरताना...
पान ३– किक २ मध्ये क्रिती
पान ४– मृणालच्या 'डकैत'चा टीझर कधी येणार?
पान ५– रश्मिकाचा 'मायसा'चा टीझर प्रदर्शीत
पान ६– असं अजिबातच नाही

# 'या' रोमँटिक सिनेमांनी गाजलं सरत वर्ष बॉक्स ऑफिसवरही केली जबरदस्त कमाई



**२०२५ वर्ष मनोरंजनाच्या बाबतीत खूपच खास ठरलं. सध्या 'धुरंधर' बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे, पण या वर्षी रोमँटिक चित्रपटांनीही आपली जादू दाखवली. या वर्षात अनेक रोमँटिक चित्रपटांनी प्रेक्षकांचे मनं जिंकली आणि बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई केली. चला जाणून घेऊ, २०२५ मधल्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या अशा काही रोमँटिक चित्रपटांबद्दल...**







**सैयारा:** या वर्षातील सर्वाधिक पसंती मिळालेला रोमँटिक चित्रपट म्हणजे 'सैयारा'. चित्रपटातील प्रेमकथा अनेकांच्या मनाला भावली. वृत्तांनुसार, 'सैयारा' २०२५ मधील सर्वाधिक कमाई करणारी रोमँटिक सिनेमा आहे. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने ३०० कोटींहून अधिकचं कलेक्शन केलं. तसेच या चित्रपटातून अहान पांडे आणि अनित पड्डा यांनी बॉलीवूडमध्ये दमदार पदार्पण केलं. या जोडीवर प्रेक्षकांनीही भरभरून प्रेम केलं.

**तेरे इश्क में :** धनुष आणि क्रिती सेनॉन यांच्या मुख्य भूमिका असलेल्या रोमँटिक ड्रामा चित्रपट 'तेरे इश्क में'ने रिलीझनंतर बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली. भारतात या चित्रपटाने पहिल्या आठवड्यात सुमारे ८३.६५ कोटी कमावले. दुसऱ्या आठवड्यात २५.१५ कोटी कमावले. सिनेमानं आतापर्यंत ११५.५ कोटी कमावले आहेत.


**दे दे प्यार दे २:** अजय देवगण आणि रकुल प्रीत सिंह यांचा चित्रपट 'दे दे प्यार दे २' हा यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ७४.१७ कोटींची कमाई केली. प्रेक्षकांनी त्यातील भावनिक कथा, विनोद आणि मुख्य कलाकारांच्या अभिनयाचं कौतुक केलं. अजय आणि रकुल यांची जोडी प्रेक्षकांना खूपच आवडली.

**एक दीवाने की दीवानियत :** हर्षवर्धन राणेचा रोमँटिक ड्रामा चित्रपट 'एक दीवाने की दीवानियत'मध्ये त्याच्यासह अभिनेत्री सोनम बाजवाही मुख्य भूमिकेत होती. हर्षवर्धन आणि सोनमच्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ७८.९९ कोटींची कमाई केली आणि २०२५ च्या टॉप रोमँटिक चित्रपटांमध्ये आपलीही एक जागा निर्माण केली. हर्षवर्धन आणि सोनमच्या अनेक चाहत्यांनी सिनेमाला चांगलाच प्रतिसाद दिला.

**भूल चूक माफ:** राजकुमार रावचा 'भूल चूक माफ' हा सिनेमादेखील बॉक्स ऑफिसवर चांगलाच यशस्वी ठरला. चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ७२.४३ कोटींची कमाई केली. त्यातील भावनिक कथा आणि अभिनयाचं प्रेक्षकांनी कौतुक केलं.

**सनी संस्कारी की तुलसी कुमारी :** वरुण धवन आणि जान्हवी कपूर यांच्या 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी' या चित्रपटाने २०२५ च्या टॉप ५ रोमँटिक चित्रपटांमध्ये स्थान मिळवलं आहे. बॉक्स ऑफिसवर चित्रपटाने ६१.८५ कोटींची कमाई केली. या चित्रपटात वरुण धवन आणि जान्हवी कपूर यांच्यासह सान्या मल्होत्रा आणि रोहित सराफ यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.

**मेट्रो इन दिनों:** मेट्रो इन दिनों या चित्रपटाने २०२५ च्या टॉप ५ रोमँटिक चित्रपटांच्या यादीत सहावा क्रमांक मिळवला आहे. यामध्ये विविध जोडप्यांच्या विविध कथा दाखवण्यात आल्या आहेत. चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ५२.१ कोटींची कमाई केली. सिनेमाचं संगीत आणि मल्टी-स्टार कास्टमुळे प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.







# वर्ष सरताना...

डिसेंबर महिना सुरू झाला की, गेल्या ११ महिन्यात वेगवेगळ्या क्षेत्रात झालेल्या घडामोडींचा आढावा घेतला जातो. या वर्षात नेमकं काय हाती लागलं, काय निसटलं याची गोळाबेरीज केली जाते. तमाम लोकांना प्रिय असणारं चित्रपट क्षेत्रदेखील याला अपवाद नाही. वर्षभरात प्रदर्शित झालेले चित्रपट, त्यातील हिट आणि फ्लॉप, एखादा स्टारचा झालेला उदय, एखाद्याची झालेली पीछेहाट, एखाद्या चित्रपटामुळे उद्भवलेला वाद, याची उजळणी करणं हे चित्रपट पाहण्याइतकंच मनोरंजक असतं.

२०२५ सरता सरता प्रदर्शित झालेल्या आदित्य धर यांच्या 'धुरंधर'ने सध्या धुमाकूळ घातला आहे. अक्षय खन्ना आणि रणबीर सिंग यांच्या अभिनयाची चर्चा होते आहे. यावर्षी हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये 'छावा', 'सैयारा' यांच्या पाठोपाठ प्रचंड कमाई करणारा चित्रपट म्हणून 'धुरंधर'ची वर्णी लागली आहे. या तीनही चित्रपटांच्या दर्जाबद्दल कितीही मत-मतांतरे असली, तरीही ओटीटीचे प्रस्थ वाढत असताना मोठ्या संख्येने प्रेक्षकांनी हे चित्रपट पाहायला थिएटरमध्ये गर्दी केली, ही वस्तुस्थिती आहे.

चित्रपट ही थिएटरमध्ये जाऊन पाहण्याची सामूहिक कला आहे, या तथ्याची जाणीव या चित्रपटांनी करून दिली. या तीन चित्रपटांचा अपवाद वगळता हिंदी चित्रपटसृष्टीसाठी हे वर्ष फारसे फलदायी ठरलेले नाही. 'वॉर २', 'जॉली एलएलबी ३', 'केसरी २' , 'सितारे जमीन पर' या चित्रपटांनी माफक यश कमावलं. 'कांतारा २' पहिल्या भागाच्या पुण्याईवर तरला. या व्यतिरिक्त आशय आणि सादरीकरण या दोन्ही पातळ्यावर हिंदीमध्ये काहीच उत्साहवर्धक घडलं नाही. जानेवारीच्या पहिल्या एक-दोन आठवड्यात प्रदर्शित होणारे मराठी चित्रपट बऱ्यापैकी चालतात. या परंपरेला यावर्षी तडा गेला. वर्षाच्या सुरुवातीला प्रदर्शित झालेले 'मुक्काम पोस्ट बोंबीलवाडी' आणि 'संगीत मानापमान' हे दोन्ही चित्रपट प्रेक्षकांना थिएटरमध्ये आणण्यास अपयशी ठरले. मराठी चित्रपट त्यातील आशयामुळे आघाडी मारतो, कलाकारांमुळे नाही, हे वास्तव यावर्षी पुन्हा एकदा सिद्ध झालं.

स्वप्निल जोशी, प्रसाद ओक, सुबोध भावे, सुमित राघवन, ललित प्रभाकर, सिद्धार्थ जाधव, महेश मांजरेकर यांच्या प्रमुख भूमिका असलेले 'जिलेबी', 'सुशीला सुजित', 'संगीत मानापमान', 'चिकी चिकी बुबुम बूम', 'सकाळ तर होऊ दे', 'प्रेमाची गोष्ट २', 'ये रे पैसा ३', 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' यांसारखे चित्रपटदेखील कधी येऊन गेले त्याचा पत्ताही लागला नाही. यावर्षी जवळपास ११० मराठी चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. त्यातील सर्वाधिक आर्थिक नफा मिळविणारा चित्रपट ठरला 'दशावतार.' सुबोध खानोलकर या तरुण दिग्दर्शकाच्या 'दशावतार'चं प्रमुख आकर्षण बुजुर्ग अभिनेते दिलीप प्रभावळकर यांचा अभिनय हे होतं. दाक्षिणात्य बाजाची सूडकथा, सुमधुर गीत-संगीत आणि झी स्टुडिओचं प्रभावी प्रसिद्धी तंत्र यामुळे महाराष्ट्रातील बहुतेक ठिकाणी जिथे मराठी चित्रपट नियमितपणे प्रदर्शित होत नाहीत, तिथे 'दशावतार'चे शो हाऊसफुल गेले. 'दशावतार'च्या बरोबरीने प्रदर्शित केल्यामुळे 'आरपार' या प्रेमपटाला, त्यात नावीन्यपूर्ण सादरीकरण असूनही बराच फटका बसला. दोनहून अधिक चित्रपट एकाच आठवड्यात प्रदर्शित केले तर मराठीचा (आधीच मर्यादित असलेला) प्रेक्षक वाटला जातो, थिएटरमध्ये पुरेसे शो मिळत नाहीत. हिंदी चित्रपटांची जीवघेणी स्पर्धा असतेच. या वस्तुस्थितीचा विचार निर्मात्यांनी न केल्यामुळे अनेक चित्रपटांना आर्थिक नुकसान सोसावे लागते, याचा प्रत्यय यावर्षीही आला. आपल्याकडील प्रमुख मराठी निर्मात्यांनी संघटित होऊन प्रदर्शनाच्या तारखा ठरवून घेतल्या तर ही नामुष्की टाळता येईल, पण अजूनही याचा गंभीरपणे कोणीही विचार करताना दिसत नाही.




'दशावतार'च्या खालोखाल ज्या मराठी चित्रपटांची यावर्षी चर्चा झाली ते चित्रपट म्हणजे, 'आता थांबायचं नाय', 'गुलकंद' आणि 'जारण.' त्यापैकी 'आता थांबायचं नाय!', 'गुलकंद' २ मेला प्रदर्शित झाले.

शिवराज वायचळने 'आता थांबायचं नाय'मधून बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांची यशोगाथा सादर केली. भरत जाधव, सिद्धार्थ जाधव, किरण खोजे, ओम भूतकर, पर्ण पेठे यांच्या कसदार अभिनयामुळे 'आता थांबायचं नाय' प्रेक्षकांना भावला. सचिन गोस्वामी दिग्दर्शित 'गुलकंद'ला हास्यजत्राच्या समीर चौगुले आणि ईशा डे यांची लोकप्रियता आणि सई ताम्हणकर व प्रसाद ओकचा संवेदनशील अभिनय यांचा फायदा झाला.





गूढकथा लेखनासाठी प्रसिद्ध असणाऱ्या हृषीकेश गुप्ते यांच्या 'जारण'ने मराठी चित्रपटात सहसा हाताळला न जाणारा भयपट हा प्रकार यशस्वीपणे मांडला. त्यातील प्रमुख भूमिकेत असणाऱ्या अमृता सुभाष आणि अनिता दाते यांच्या अभिनयाचं खूप कौतुक झालं.चित्रपट प्रदर्शनाची अचूक वेळ या चित्रपटांच्या निर्मात्यांनी साधली त्यामुळे या चित्रपटांना प्रेक्षकवर्ग मिळाला. हेमंत ढोमेच्या 'फसक्लास दाभाडे'देखील त्यातील वेगळ्या विषय हाताळणीमुळे चर्चेत राहिला, पण थिएटरपेक्षा ओटीटीवर तो अधिक प्रेक्षकांनी पाहिला. 'खलीद का शिवाजी', 'मनाचे श्लोक' या चित्रपटांच्या प्रदर्शनापूर्वीच त्यांच्या शीर्षकावरून वाद उद्भवले. सेन्सॉरने संमत केलेल्या या चित्रपटांना काही विशिष्ट गटांच्या नाराजीमुळे माघार घ्यावी लागली. चित्रपट न पाहताच त्यावर घेतले जाणारे असे आक्षेप कलाक्षेत्राला घातक आहेत. याबाबतीत एक उदाहरण सांगावेसे वाटते, १९३६ साली प्रदर्शित झालेल्या 'देवदास' (दिग्दर्शक : प्रथमेश बरुआ) या चित्रपटाने प्रभावित होऊन अनेक तरुण प्रेमभंगाच्या दुःखात व्यसनाधीन होऊ लागले होते. या वृत्तीला विरोध करण्यासाठी व्ही. शांताराम यांनी १९३९ साली 'माणूस' (हिंदी- 'आदमी') ची निर्मिती करून प्रेमात अपयशी ठरलो तरीही निराश न होता संपन्न आयुष्य जगायला हवं, असा संदेश दिला. कलेतून मांडलेला विचार पटला नाही तर त्याला दुसऱ्या कलाकृतीतून उत्तर देण्याची परंपरा आपण पूर्णपणे विसरून गेलो आहोत. अशा प्रकारच्या स्वयंघोषित सेन्सॉरशिपचा फटका यापुढील काळात कोणत्याही कलाकृतीला बसू नये यासाठी प्रेक्षक म्हणून आपण सजग होऊ अशी अपेक्षा व्यक्त करणे गैर ठरणार नाही.










आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात गौरवलेले गेलेले 'स्थळ' आणि 'साबर बोंड' हे चित्रपट प्रदर्शित झाले; मात्र त्यांना प्रेक्षकांचा योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही. 'साबर बोंड'ची चर्चा मराठीपेक्षाही अमराठी वर्तुळात अधिक झाली. संतोष डावखर यांचा 'गोंधळ' त्यातील सफाईदार तंत्र आणि रोमांचक कथानक यांच्यामुळे लोकप्रिय झाला. इफ्फी महोत्सवात 'गोंधळ'ला स्पर्धेत रौप्यपदक आणि संतोष डावखर यांना सर्वोत्तम दिग्दर्शक हा पुरस्कार मिळाला. दर्जेदार कथानक आणि उत्तम तांत्रिक बाजू असतील तर आपण आंतरराष्ट्रीय स्पर्धेत अव्वल ठरू शकतो, हे 'गोंधळ'ने सिद्ध केले. आता वर्ष सरता सरता क्षितिज पटवर्धनचा 'उत्तर' प्रदर्शित झाला आहे. रेणुका शहाणे आणि अभिनय बेर्डेची प्रमुख भूमिका असणारा 'उत्तर' त्यातील हृदयस्पर्शी कथानकांमुळे प्रेक्षकांच्या पसंतीस पडतो आहे. वर्षाची अखेर अशी सुखावह होत आहे. येत्या वर्षात आपल्या सर्वांना असे प्रयोगशील आणि मनोरंजक चित्रपट पाहण्याची संधी मिळेल, अशी अपेक्षा करत या वर्षाला निरोप देऊ या!







**डॉ. संतोष पाठारे**

# किक २ मध्ये क्रिती



बिग बॉस १९ चे पर्व संपल्यानंतर अभिनेता सलमान खान त्याच्या आगामी प्रोजेक्टसाठी उत्सुक आहे. तो सध्या अपूर्व लाखियाच्या बॅटल ऑफ गलवान या चित्रपटाच्या चित्रीकरणात व्यस्त आहे, या चित्रपटात सलमानसोबत अभिनेत्री चित्रांगदा सिंह झळकणार आहे. या चित्रपटाशिवाय सलमान खानकडे अनेक मोठे प्रोजेक्ट आहेत, त्यापैकी एक 'किक-२' आहे, किक चित्रपटाला मिळालेल्या यशानंतर मेकर्सनी चित्रपटाचा सिक्वल करण्याचे ठरवले आहे. या चित्रपटात अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस दिसणार होती. पण तिच्या जागी एका प्रसिद्ध अभिनेत्रीला संधी दिली जाणार आहे. वृत्तानुसार, निर्माता साजिद नाडियाडवाला सलमान खानच्या वाढदिवसानिमित्त किक २ ची अधिकृत घोषणा करणार असल्याची शक्यता आहे. यामुळे चित्रपटात अभिनेत्री क्रिती सॅनेल जॅकलिनची जागा घेण्याची शक्यता आहे. मात्र, अद्यापपर्यंत याबाबत निर्मात्यांनी कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. साजिद नाडियाडवालाने गेल्या काही दिवसांपूर्वी एक पोस्ट देखील शेअर केली होती. या पोस्टमध्ये 'द किक स्टार्ट विथ द मॅन', असा मजूकर लिहिला होता. त्यानंतर किकच्या दुसऱ्या भागाची पुन्हा चर्चा सुरू झाली. २०१४ मध्ये सलमान खानचा किक चित्रपट प्रदर्शित झाला होता. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरला. चित्रपटाने देशांतर्गत २३१.८५ कोटी आणि जगभरात ३८८ कोटींची भरगच्च कमाई केली होती. चित्रपटात सलमान खान आणि जॅकलिन व्यतिरिक्त नवाजुद्दीन सिद्दीकी, रणदीप हुड्डा आणि अर्चना पूरण सिंग यांच्याही महत्त्वाच्या भूमिका होत्या. आता किक २ ची उत्सुकता प्रेक्षकांना लागली आहे. जर सारे काही ठरल्याप्रमाणे झाले तर २०२७ च्या ईदला 'किक २' प्रदर्शित करण्याची योजना आखली जाऊ शकते.

# 'महावतार नरसिंह' ऑस्करच्या शर्यतीत

२०२६ च्या ऑस्करमध्ये सर्वोत्कृष्ट निमेटेड फीचर फिल्मसाठी पात्र असलेल्या चित्रपटांची यादी जाहीर झाली आहे आणि महावतार नरसिंह हा भारतीय चित्रपट पात्र ठरला आहे. अकादमीने स्वतः एक अधिकृत अपडेट शेअर केला आहे. ज्यामध्ये महा-वतार नरसिंह या श्रेणीतील अनेक चित्रपटांशी स्पर्धा करेल याची पुष्टी केली आहे. तसेच चित्रपटाची ३४ चित्रपटांमधून निवड करण्यात आली आहे, ही मोठी बाब आहे. महावतार नरसिंह २५ जुलै रोजी प्रदर्शित झाला होता. दिग्दर्शक अश्विन कुमार यांच्या 'महावतार नरसिंह' या पौराणिक निमेटेड चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर विक्रमी कमाई केली आहे. ४० कोटींच्या बजेटमध्ये बनलेल्या या चित्रपटाने देशांतर्गत २५१.३० कोटी तर जगभरात ३२६.८२ कोटींची कमाई केली. भारतातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या निमेटेड चित्रपटांचा विक्रम या एकट्या चित्रपटाने मोडला आहे. महावतार नरसिंह हा चित्रपट अमेरिकेतील क्वालिफाइड कमर्शियल थेटरमध्ये प्रदर्शित झाल्यानंतर ऑस्करच्या पात्रतेत आला. ऑस्करच्या पात्रतेच्या नियमानुसार, अमेरिकेत याच ठिकाणी दिवसातून किमान ३ वेळा आणि सलग ७ दिवस चित्रपट दाखवणे आवश्यक आहे. त्यातील एक शो सायंकाळी ६ ते रात्री १० या प्राईम टाईममध्ये स्लॉट असणे आवश्यक आहे. हे सर्व निकष पूर्ण केल्यानंतर चित्रपटाला शॉर्टलिस्ट करण्यात आले. आपल्या देशात पौराणिक कथांचा खजिना आहे. लहानपणी आपण सर्वांनीच विष्णूच्या अवतारांच्या अनेक गोष्टी ऐकल्या आहेत. त्यापैकीच एक रंजक गोष्ट म्हणजे नरसिंह अवताराची आणि भक्त प्रल्हादाची. 'महावतार नरसिम्हा' मध्ये, दिग्दर्शक अश्विन कुमार यांनी चराचरात देव पाहणाऱ्या भक्त प्रल्हाद आणि स्वतःलाच देव मानणाऱ्या असुर हिरण्यकश्यपूची ही कथा निमेशनच्या अनोख्या शैलीत मांडली आहे.

# कियाराचा टॉक्सिकमधील लूक रिव्हील



बॉलीवूड अभिनेत्री कियारा अडवाणी सध्या तिच्या आगामी 'टॉक्सिक' चित्रपटामुळे चर्चेत आहे, हा चित्रपट १९ मार्च २०२६ मध्ये देशभरात प्रदर्शित होणार आहे. केजीएफ फेम अभिनेता यश या चित्रपटात मुख्य भूमिकेत असून, त्याचा जबदस्त लूक आणि चित्रपटाचा टीझर अगोदर प्रदर्शित करण्यात आला आहे. आता अभिनेत्री कियारा अडवाणीचा दमदार लूक रिव्हील करण्यात आला आहे. अभिनेता यशने इंस्टाग्रामवर कियारा अडवाणीचा फर्स्ट लूक शेअर केला आहे. या फोटोत ती रॅम्पवर चालताना दिसत आहे. लक्ष वेधून घेणारा गाऊन तिने वेअर केला आहे. पोस्टर शेअर करत यशने टॉक्सिक-अ फेयरी टेल फॉर ग्रोन्स-अप्समध्ये नादियाच्या भूमिकेत कियारा अडवाणी. असे कॅप्शन दिले आहे. ही पोस्ट शेअर करून अभिनेत्याने कियाराचा चित्रपटामध्ये असलेल्या पात्राचे नाव काय आहे. याबाबत सांगितले आहे. यश, नयनतारा आणि कियारा अडवाणी हे तिघेही 'टॉक्सिक' चित्रपटात दिसणार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन गीतू मोहनदास यांनी केले आहे. सोशल मीडियावर कियाराच्या लूकला चाहत्यांनी पसंती दर्शवली असून चांगला प्रतिसाद दिला आहे. अनेक युजर्सनी कमेंट्स केल्या आहेत. एका युजरने चित्रपटाच्या ट्रेलरची वाट पाहत आहे. असे म्हटले आहे. दुसऱ्या वापरकर्त्याने, क्रेझी बॉस आणि नादिया. आणखी एका वापरकर्त्याने, भारताचा सर्वात मोठा चित्रपट. अशा प्रकारच्या कमेंट्स केल्या आहेत. अभिनेता यश याला केजीएफ चित्रपटाने मोठी प्रसिद्ध मिळवून दिली. त्यानंतर या चित्रपटाचा सिक्वलही आला. त्यालाही प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद दिला. आता यश टॉक्सिक या बहुप्रतिक्षित चित्रपटातून पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाची प्रेक्षक आणि यशचे चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत.



# ‘अवतार ३’ मध्ये गोविंदाचा कॅमिओ?

हॉलिवूड दिग्दर्शक जेम्स कॅमेरॉन यांचा 'अवतार: फायर अँड श' हा चित्रपट सध्या जगभरातील चित्रपटगृहात धुमाकूळ घालत आहे. मात्र, भारतात या चित्रपटाची चर्चा एका वेगळ्याच कारणाने रंगली आहे. सोशल मीडियावर सध्या काही फोटो तुफान व्हायरल होत आहेत. ज्यात बॉलिवूडचा 'हिरो नंबर १' म्हणजेच अभिनेता गोविंदानं 'अवतार: फायर अँड श'मध्ये कॅमिओ केल्याचा दावा केला जात आहे. गोविंदा याने मागील काही मुलाखतींमध्ये हॉलिवूडचा सुपरहिट सिनेमा 'अवतार' याबाबत मोठे दावे केले होते. गोविंदाच्या म्हणण्यानुसार, दिग्दर्शक जेम्स कॅमेरॉन यांनी त्याला या चित्रपटासाठी ऑफर दिली होती. मात्र, कलाकारांच्या शरीरावर पेंट करण्याची अट असल्याने आपण हा सिनेमा नाकारल्याचा दावा गोविंदाने केला होता. दरम्यान, आता सोशल मीडियावर एक फोटो प्रचंड व्हायरल होत आहे. ज्यामध्ये गोविंदा 'अवतार: फायर अँड ॲश'मध्ये दिसत असल्याचा दावा केला जात आहे. काही द युजर्सनी हा फोटो शेअर करत गोविंदाने या चित्रपटात कॅमिओ केल्याचे म्हटले आहे. मात्र, हे सत्य नसून, गोविंदाचा या चित्रपटात कोणताही कॅमिओ नाही. गोविंदाचे हे फोटो एआयद्वारे तयार करण्यात आले असावेत किंवा फोटोशॉप वापरून गोविंदाचा चेहरा 'नावी' पात्रावर बसवण्यात आला.

# रणवीर सिंहची ‘डॉन ३’मधून एक्झिट?



बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंह सध्या ‘धुरंधर’मुळे चर्चेत आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटातील त्याच्या अभिनयासाठी प्रेक्षकांकडून त्याचं कौतुक होत आहे. पण, सध्या अभिनेता अजून एका गोष्टीमुळे चर्चेत आला आहे. रणवीर सिंह सध्या चर्चेत येण्यामागचं दुसरं कारण म्हणजे त्याने एका बहुचर्चित चित्रपटातून एक्झिट घेतल्याचं म्हटलं जात आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार रणवीरने फरहान अख्तरच्या ‘डॉन ३’ मधून एक्झिट घेतल्याची चर्चा सुरू आहे. पिंकव्हिलाच्या वृत्तानुसार रणवीर सिंह येत्या काळात संजय लीला भन्साळी, लोकेश कनागराज यांच्याबरोबर काम करण्यासाठी उत्सुक असून त्याला एका पाठोपाठ ‘गँगस्टर’ चित्रपटांमध्ये काम करायचं नाहीये. विशेष करून त्याच्या आता ‘धुरंधर’मधील भूमिकेनंतर. अद्याप चित्रपटाच्या मेकर्सने याबद्दल कुठलीही अधिकृत माहिती दिलेली नाही. यामुळेच ‘प्रलय’ चित्रपटाचे दिग्दर्शक जय मेहता यांनी चित्रपटाचं शूटिंग लवकर सुरू करायला सांगितल्याचं म्हटलं जात आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार रणवीरला या चित्रपटाचं चित्रीकरण ठरवलेल्या कालावधीच्या आधी पूर्ण करायचं असून यासाठी तो स्वत; शूटिंगच्या तारखांचं नियोजन करत असल्याचंही म्हटलं जात आहे. रणवीर लवकरच ‘डॉन ३’चं शूटिंग सुरू करणार होता. अशातच आता समोर आलेल्या बातम्यांनुसार ‘धुरंधर’चं चित्रीकरण पुढे ढकललं असून मेकर्स कदाचित नवीन अभिनेत्याच्या शोधात असल्याचं म्हटलं जातंय. फ्री प्रेस जरनलच्या वृत्तानुसार ‘डॉन ३’ची २०२३ मध्ये घोषणा झालेली, पण काही ना काही कारणामुळे या चित्रपटाचं चित्रीकरण पुढे ढकलण्यात आलं. आधी कियारा अडवाणी या चित्रपटाचा भाग होती आणि त्यानंतर क्रिती सेनॉनची वर्णी लागल्याचीही चर्चा होती. दरम्यान, ‘डॉन ३’साठी रणवीर सिंहची निवड करण्यात आल्यानंतर अनेकांनी त्याला ट्रोलही केलं. ‘डॉन’ चित्रपटाच्या पूर्वीच्या भागांमध्ये अमिताभ बच्चन व शाहरुख खान यांनी काम केलं होतं, त्यामुळे अनेक जणांनी रणवीरची त्यांच्याशी तुलना केली.

# मृणालच्या ‘डकैत’चा टीझर कधी येणार?



अभिनेत्री मृणाल ठाकुर आणि अभिनेता अदिवी शेष यांची आगामी फिल्म ‘डकैत’ सध्या चर्चेत आहे. या चित्रपटाच्या टीझरची रिलीज डेट जाहीर झाल्यामुळे चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे. मृणाल ठाकुरने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत माहिती दिली की ‘डकैत’चा दमदार टीझर रिलीज झाला आहे. विशेष म्हणजे, टीझर दोन शहरांमध्ये वेगवेगळ्या वेळेला दाखवला आहे. मुंबईतील गॅलेक्सी थिएटरमध्ये सकाळी ११ वाजता, तर हैदराबादमध्ये संध्याकाळी ६.३० वाजता टीझरची झलक पाहायला मिळाली. हा चित्रपट १९ मार्च २०२६ रोजी हिंदी आणि तेलुगू भाषांमध्ये जगभरातील सिनेमागृहांत प्रदर्शित होणार आहे. ‘डकैत’चे दिग्दर्शन शेनिल देव यांनी केले आहे. या चित्रपटात मृणाल ठाकुर, अदिवी शेष यांच्यासोबत प्रकाश राज, सुनील, अतुल कुलकर्णी, जैन मेरी खान, कामाक्षी भास्कर आणि अनुराग कश्यप महत्त्वाच्या भूमिकांत दिसणार आहेत. चित्रपटाची कथा एका रागीट गुन्हेगाराभोवती फिरते, जो प्रेयसीकडून झालेल्या विश्वासघाताचा बदला घेण्यासाठी धोकादायक मार्ग स्वीकारतो. या चित्रपटाची निर्मिती सुप्रिया यारलागड्डा यांनी केली असून सुनील नारंग सह-निर्माते आहेत.

अन्नपूर्णा स्टुडिओजच्या बॅनरखाली तयार झालेल्या या चित्रपटात हाय-एंड ॲक्शन सीन्स पाहायला मिळणार आहेत. शूटिंगदरम्यान काही कलाकारांना दुखापतही झाली होती. दरम्यान, मृणाल ठाकुर नुकतीच ‘सन ऑफ सरदार-२’ या चित्रपटात झळकली होती. आता ‘डकैत’मधील तिच्या भूमिकेकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले असून, टीझरनंतर या चित्रपटाची चर्चा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

# 'राउडी जनार्दन'साठी रश्मिकाने केलं विजयचं कौतुक



अभिनेत्री रश्मिका मंदान्ना साऊथ स्टार अभिनेता विजय देवरकोंडाची कौतुक करण्याची एकही संधी सोडत नाही. आता अभिनेत्रीने पुन्हा एकदा विजयचे त्याचा आगामी चित्रपट राउडी जनार्दनसाठी कौतुक केले आहे. विजय देवरकोंडा त्याच्या आगामी राउडी जनार्दन चित्रपटामुळे चर्चेत आहेत. काही दिवसांपूर्वीच या नवीन चित्रपटाच्या घोषणा करण्यात आली. नुकताच एक व्हिडीओ चित्रपटाच्या शीर्षकासह रिलीज करण्यात आला आहे. हा चित्रपट पुढच्या वर्षी २०२६ मध्ये प्रदर्शित होणार आहे. यावर रश्मिकाने प्रतिक्रिया दिली आहे.

चित्रपटाबद्दलचा तिचा उत्साह व्यक्त करताना रश्मिकाने संपूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या आहेत. तिने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर टायटल व्हिडीओ शेअर केला आहे. वाह, हे अद्भुत आहे! हे अद्भुत आहे! काय दृश्ये! काय संगीत! काय वातावरण! काय कलाकार! अशी प्रतिक्रिया रश्मिकाने दिली आहे. विजय देवरकोंडा आणि रवी किरण कोला तुम्ही दोघेही अद्भुत आहात. मला हे खूप आवडले. कीर्ती सुरेश या चित्रपटासाठी तुला शुभेच्छा, असेही रश्मिकाने पोस्टमध्ये लिहिले आहे. गेल्या काही दिवसांपासून विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदान्ना यांच्या अफेअरच्या बातम्या समोर येत असून दोघेही २०२६ मध्ये लग्न करणार असल्याची शक्यता आहे. ऑक्टोबरमध्ये दोघांचा साखरपुडा झाल्याची चर्चा होती. यावर दोघांनीही मौन बाळगले असून अद्यापर्यंत खुलासा केलेला नाही.

विजयच्या कामाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास तो किंगडम चित्रपटात दिसला होता. चित्रपटाले फारसे यश बॉक्स ऑफिसवर मिळाले नाही. त्यामुळे त्याच्या आगामी राउडी जनार्दनमध्ये तरी काहीतरी करिश्मा विजय करणार असल्याचा विश्वास चाहत्यांना आहे. हा विश्वास किती खरा ठरतो हे चित्रपट प्रदर्शित झाल्यावर समजू शकेल.



# रुक्मिणी वसंत लवकरच बॉलिवूडमध्ये

कांतारा चॅप्टर १' चित्रपटात राजकुमारी कनकवती ही भूमिका साकारून प्रेक्षकांची मने जिंकणारी रुक्मिणी वसंत हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवण्यास तयार आहे. अभिनेत्रीने यासंबंधी संकेत दिले आहेत. 'कांतारा चॅप्टर १' चित्रपटानंतर रुक्मिणीला अनेक भूमिकांच्या ऑफर्स मिळाल्या असून ती काही चित्रपटांकरता बोलणीही करत आहे. अनेक भूमिकांसाठी चर्चा सुरु असून याकरता मी उत्साहित असल्याचे तिने म्हटले आहे. रुक्मिणी ही आगामी काळात यशच्या टॉक्सिक चित्रपटात दिसून येणार आहे. सैन्याची पार्श्वभूमी राहिल्याने रुक्मिणीला हिंदी भाषेचे ज्ञान आहे. हिंदी चित्रपटांशी माझे नेहमीच नाते राहिले आहे. सैन्य परिवाराशी संबंध असल्याने हिंदी नेहमीच आमच्या प्रत्येक छावणीला इतरांशी जोडणारा धागा राहिली असल्याचे तिने म्हटले आहे. १० डिसेंबर १९९६ रोजी जन्मलेल्या रुक्मिणीने कन्नड, तमिळ आणि तेलगू चित्रपटांमध्ये काम केले आहे. तिने कन्नड चित्रपट 'बिरबल'द्वारे स्वत:च्या अभिनयाची कारकीर्द सुरू केली होती. तर २०२३ मध्ये प्रदर्शित एका चित्रपटामुळे तिला मोठे यश मिळाले. याकरता तिला अनेक पुरस्कारही मिळाले होते.

# रश्मिकाचा 'मायसा'चा टीझर प्रर्दशीत

साऊथ अभिनेत्री रश्मिका मंदाना पुन्हा एकदा तिच्या नव्या सिनेमातून धमाका करणार आहे. पुष्पा, ॲनिमल सारख्या हिट सिनेमांनंतर रश्मिकाच्या 'मायसा' या सिनेमाची जोरदार चर्चा सुरू आहे. या सिनेमातील रश्मिकाची पहिली झलक समोर आली आहे. 'मायसा' सिनेमाचा टीझर नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. यामध्ये रश्मिकाचा कधीही न पाहिलेला लूक दिसत आहे. 'मायसा'च्या टीझरमध्ये दिसतंय की जंगलात एक मुलगी दिसत आहे. तिला मारण्यासाठी जमाव तिच्या दिशेने येत असल्याचं दिसत आहे. त्या जमावाला सामोरं जाण्यासाठी ती मुलगी तयार आहे. ही मुलगी म्हणजेच रश्मिका आहे. रश्मिका जखमी अवस्थेत दिसत आहे. तिच्या हातात बंदूक आहे. चेहऱ्यावर जखमा आणि पायही रक्ताने माखलेले दिसत आहेत. जमावातून एक आगीची बॉटल तिच्याकडे फेकली जाते. पण, ती न घाबरता बंदूक रोखून त्याला उत्तर देत असल्याचं दिसत आहे. जणू एका घायाळ वाघिणीसारखी रश्मिका भासत आहे. रश्मिकाच्या 'मायसा' सिनेमाचा हा टीझर पाहून अंगावर काटा उभा राहत आहे. 'मायसा'चा टीझर शेअर करत रश्मिकाने ही फक्त एक सुरुवात आहे, असं कॅप्शन तिने दिलं आहे. रश्मिकाच्या सिनेमाचा टीझर पाहून चाहत्यांची सिनेमाबाबतची उत्सुकता वाढली आहे. या टीझरवर चाहत्यांनी कमेंट केल्या आहेत. सिनेमा ब्लॉकबस्टर होणार, लेडी सुपरस्टार रश्मिका, हिच्या अभिनयाच्या मी प्रेमात आहे, अंगावर काटा आला, इंटरनॅशनल क्रश अशा कमेंट्स चाहत्यांनी केल्या आहेत. 'मायसा' हा सिनेमा एक ॲक्शन थ्रीलर असणार आहे. ज्यामध्ये रश्मिका ॲक्शन सीन्स करताना दिसणार आहे. येत्या नवीन वर्षात म्हणजेच २०२६ मध्ये रश्मिकाचा हा नवा सिनेमा प्रदर्शित होणार आहे. हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर धमाका करणार असल्याचं बोललं जात आहे.



# रिंकू राजगुरूला या गोष्टींची वाटते भीती



रिंकू राजगुरू मराठी कलाविश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री आहे. तिने 'सैराट' चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले आणि त्यानंतर तिने कधीच मागे वळून पाहिले नाही. या चित्रपटातून तिला एका रात्रीत चांगलीच लोकप्रियता मिळाली. तिने आणखी काही मराठी सिनेमात काम केले. हिंदी वेबसीरिजमध्येही ती झळकली आहे. नुकताच तिचा आशा हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाच्या निमित्ताने तिने एका शोमध्ये हजेरी लावली होती. यावेळी तिने तिला काही गोष्टींची भीती वाटत असल्याचे सांगितले. रिंकू राजगुरूने एका कार्यक्रमात हजेरी लावली होती. यावेळी ती म्हणाली की, आता खूप गोष्टींची भीती वाटते. विश्वास ठेवायची भीती वाटते. माणसं गमावण्याची भीती वाटते.

तर एवढंच ऐकतोच ना आपण आता किती गोष्टी आजूबाजूला मुलींच्या बाबतीत असतील बातम्यांमध्ये असतील. साधारणपणे मी जेन झी आहे पण त्या टर्म्स कंडिशन्स सगळ्याच गोष्टी असतील. तर त्याच्यामुळे माणूस म्हणून पटकन कोणावरती विश्वास ठेवावा का ह्या गोष्टीची भीती वाटते आणि माणसं गमावण्याची मला भीती वाटतेच. रिंकू राजगुरूचा आशा हा सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला. या सिनेमात महिलांची झगडणारी दुनिया, त्यांचा आत्मविश्वास आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी अतिशय भावस्पर्शी पद्धतीने मांडली आहे. या कथानकाच्या केंद्रस्थानी आहे आशा सेविका आणि ही भूमिका रिंकूने साकारली आहे. या व्यक्तिरिक्त या चित्रपटात सायंकित कामत, उषा नाईक, शुभांगी भुजबळ, सुहास शिरसाट, दिशा दानडे, दिलीप घारे आणि हर्षा गुप्ते यांसारखे कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये झळकणार आहेत.

# 'लग्नाचा शॉट' चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित

सध्या सर्वत्र लग्नाचा सीझन सुरु आहे. सगळीकडे आपल्याला लग्नाची धावपळ पाहायला मिळत आहे. लग्नाची तयारी करताना उडणारी तारांबळ या आधारित दिग्दर्शन अक्षय गोरे एक नवा चित्रपत प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन आले आहेत. लग्न म्हणजे आनंद, उत्साह आणि तयारी. पण कधी कधी हाच आनंद गोंधळात बदलला तर? याच सगळ्या गोंधळावर आधारित 'लग्नाचा शॉट' हा चित्रपट ६ फेब्रुवारी रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नुकतेच या चित्रपटाचे मजेशीर मोशन पोस्टर प्रदर्शित झाला आहे. चित्रपटाच्या नावावरूनच हा प्रकार काहीसा वेगळा आणि धमाल असणार, याची कल्पना येते. लग्नाच्या धावपळीमध्ये घडणार्या अनपेक्षित गोष्टी, चुकीचे अंदाज, गैरसमज आणि त्यातून निर्माण होणारा गोंधळ याभोवती या चित्रपटाची गोष्ट फिरते. मात्र, हा गोंधळ कोणता आहे आणि 'लग्नाचा शॉट' नेमका काय आहे, हे चित्रपट पाहिल्यावरच समजणार आहे आहे.

सध्यातरी या चित्रपटात कोणाचे चेहरे झळकणार आहेत हे गुलदस्त्यात आहे. या चित्रपताचं दिग्दर्शन अक्षय गोरे यांनी केलं आहे. दिग्दर्शक अक्षय गोरे म्हणतात, 'लग्नाचा शॉट हा चित्रपट म्हणजे लग्नाच्या गोंधळाकडे मजेशीर पद्धतीने पाहणारी गोष्ट आहे. कोणालाही कंटाळा न येता, संपूर्ण कुटुंबाला एकत्र बसून पाहाता येईल, असा हा निव्वळ मनोरंजनाचा अनुभव आहे. कुठलाही संदेश देण्याचा अट्टहास नाही, कुठलाही गंभीर सूर नाही, केवळ हलकंफुलकं, स्वच्छ आणि प्रामाणिक मनोरंजन हेच या चित्रपटाचं वैशिष्ट्य आहे.' महापर्व फिल्म्स निर्मित, जिजा फिल्म्स यांच्या सहयोगाने प्रेक्षकांच्या भेटीला या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन अक्षय गोरे यांनी केलं असून या चित्रपटाला प्रवीण कोळी आणि योगिता कोळी यांचे संगीत लाभलं आहे. अक्षय महादेव गोरे, विजय महादेव गोरे, अभिषेक उत्कर्ष कोळी आणि सुरेश मंगललाल प्रजापती या चित्रपटाचे निर्माते आहे.

# प्रसिद्धीपासून दूर राहणं ही त्याची खासियत




आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर तुफान सुरू आहे. चित्रपटाला व्यावसायिक यश मिळत असतानाच प्रेक्षक आणि समीक्षकांकडूनही चांगली दाद मिळत आहे. चित्रपटातील सर्व कलाकारांच्या भूमिका प्रेक्षकांना आवडल्या असल्या, तरी अक्षय खन्नाने साकारलेला रहमान डकैत विशेष चर्चेत आहे. सोशल मीडियावर त्याचं खूपच कौतुक होत आहे. या चर्चेंदरम्यान, चित्रपटात अजय सन्याल ही भूमिका साकारणाऱ्या आर. माधवनने अक्षय खन्नाच्या कौतुकाबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. अक्षय खन्नाला मिळणाऱ्या प्रसिद्धीमुळे आर. माधवनला झाकोळले गेल्यासारखं वाटतं का? असं विचारण्यात आलं. याबद्दल एका मुलाखतीत आर. माधवन म्हणाला, असं अजिबातच नाही. अक्षयला मिळत असलेल्या प्रसिद्धी आणि यशामुळे मला खूप आनंद झाला आहे. त्याला जी प्रशंसा मिळते आहे, त्यासाठी तो पूर्णपणे पात्र आहे. मी त्याच्यासाठी आनंदी आहे. यापुढे आर. माधवननं अक्षय खन्नाचे कौतुक करत प्रसिद्धीपासून दूर राहणं ही त्याची खासियतच असल्याचं नमूद केलं. अक्षयच्या स्वभावाबद्दल बोलताना माधवन म्हणाला, तो आता प्रसिद्धी आणि लोकप्रियतेचा फायदा घेऊन हजारो मुलाखती देऊ शकतो. पण तो सध्या आपल्या नव्या घरात शांततेचा आनंद घेत बसला आहे. शांतता ही त्याला नेहमीच आवडत आली आहे. याच मुलाखतीत आर. माधवननं प्रसिद्धीबाबत स्वतःचं मतही मांडलं. याबद्दल तो म्हणाला, मला वाटायचं की, प्रसिद्धीच्या बाबतीत मीच मागे मागे राहतो की काय पण अक्षय खन्नाही तसाच आहे. त्याला या यश, प्रसिद्धी आणि लोकप्रियतेचा काहीही फरक पडत नाही. यश आणि अपयश त्याच्यासाठी सारखंच आहे. यापुढे त्यानं 'धुरंधर'सारख्या चित्रपटाशी आपलं नाव जोडलं जाणं ही त्याच्यासाठी अभिमानाची गोष्ट असल्याचंही म्हटलं. शेवटी माधवन म्हणाला की, अक्षय खन्ना आणि दिग्दर्शक आदित्य धर दोघेही चित्रपटाच्या यशाचा गवगवा करण्यात रस घेत नाहीत. अक्षय असो किंवा दिग्दर्शक आदित्य धर, दोघांनाही या यशाचा फायदा उचलण्यात काहीच स्वारस्य नाही. ते फक्त त्यांचं काम चोख करतात. दरम्यान, 'धुरंधर' हा चित्रपट ५ डिसेंबर रोजी प्रदर्शित झाला असून बॉक्स ऑफिसवर चांगलीच कमाई करत आहे. या चित्रपटात रणवीर सिंह, अक्षय खन्ना, अर्जुन रामपाल, संजय दत्त, सारा अर्जुन, राकेश बेदी यांच्यासह अनेक कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. पुढच्या वर्षात सिनेमाचा दुसरा भाग प्रदर्शित होणार असून त्याची सर्वजण वाट पाहत आहेत.



# माझ्याबरोबर कधीच, गोविंदा तसं वागला नाही!

माधुरी दीक्षितने तिच्या करिअरमध्ये अनेक स्टार्सबरोबर काम केलं. माधुरीने नवदच्या दशकात अनिल कपूर व जॅकी श्रॉफ यांच्याबरोबर बरेच चित्रपट केले. माधुरीची या दोघांबरोबरची केमिस्ट्री प्रेक्षकांना खूप आवडली होती. माधुरीने हे दोन्ही अभिनेते सेटवर वेळेवर यायचे असं म्हणत त्यांचं कौतुक केलं. मी देवाचे आभार मानते, की मी अशा लोकांबरोबर काम केलं जे नेहमी वेळेवर यायचे. हे दोन अभिनेते म्हणजे अनिल कपूर आणि जॅकी श्रॉफ होय. गोविंदा सेटवर उशीरा यायचा, असं माझ्याबरोबर कधीच घडलं नाही, असं माधुरी दीक्षित म्हणाली. गोविंदा सेटवर उशीरा यायचा असं म्हटलं जातं. त्याच्याबरोबर काम करण्याचा अनुभव कसा होता, हे विचारलं असता माधुरीने हे उत्तर दिलं. पुढे माधुरी म्हणाली, गोविंदाने एकाच वेळी बरेच चित्रपट साईन केले होते, त्यामुळे त्याला उशीर व्हायचा. याचा परिणाम इतर कलाकारांवर व्हायचा, त्यामुळे सर्वजण त्याला अनप्रोफेशनल म्हणू लागले होते. पण तसं नव्हतं. गोविंदा माझ्या सिनेमात नेहमीच वेळेवर आला आहे. माधुरी दिक्षीतने अनिल कपूरबरोबर तेजाब, किशन कन्हैया आणि खेल, बेटा, टोटल धमाल, पुकार या हिट चित्रपटांमध्ये काम केलं. तर जॅकी श्रॉफबरोबर त्रिदेव, खलनायक, देवदासमध्ये काम केलं होतं. गोविंदाबरोबर माधुरीने पाप का अंत, इज्जतदार, महा संग्राम, बडे मियां छोटे मियां हे चित्रपट केले. बडे मियां छोटे मियांमध्ये अमिताभ बच्चन देखील होते. मुकेश खन्ना यांना अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत गोविंदाने सेटवर नेहमी उशिरा येण्याच्या आरोपावर स्पष्टीकरण दिलं. मी सेटवर कधीही वेळेवर पोहोचत नव्हतो. मी दिलीप कुमार साहेबांचा फॉलोअर होतो. मी उशिरा जायचो नाही. पण जोपर्यंत माझा मूड निट व्हायचा नाही तोवर जायचो नाही, त्यासाठी मला थोडा वेळ लागायचा, असं गोविंदा म्हणाला.



# अक्षय खन्ना होता तारा शर्मासोबत रिलेशनशिपमध्ये!

बॉलीवूड अभिनेता अक्षय खन्ना सध्या त्याच्या 'धुरंधर' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. यातील त्याच्या कामाचं प्रेक्षक खूप कौतुक करत असून यासंबंधित अनेक फोटो व रील सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. यादरम्यान त्याच्या खासगी आयुष्याबद्दलही सध्या चर्चा केली जात आहे. अभिनेता वयाच्या पन्नाशीतही अविवाहित आहे. अशातच आता त्याच्या एक्स गर्लफ्रेंडने नुकतीच त्याच्यासाठी पोस्ट शेअर केल्याने या चर्चांना उधाण आलं आहे, त्यामुळे अनेकजण याबद्दलही बोलताना दिसत आहेत. काही दिवसांपासून अक्षय खन्नाची एक क्लीप सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. यामध्ये तो त्याला कधीही लग्न करायचं नसून लग्न किंवा पत्नी ही खूप मोठी जबाबदारी असून त्याला ही जबाबदारी नको असल्याचं बोलताना दिसतोय. पण, असं असलं तरी एकेकाळी अभिनेता रिलेशनशिपमध्ये होता असंही म्हटलं जात आहे. अभिनेता तारा शर्मासह रिलेशनशिपमध्ये होता आणि आता ताराने इन्स्टाग्रामवर 'धुरंधर' चित्रपटाबद्दल पोस्ट शेअर करत त्याचं कौतुक केलं आहे. २००७ मध्ये अक्षयला 'तुझ्या जवळच्या मित्रांना तारा तुझ्यासाठी योग्य मुलगी आहे आणि तुम्ही लग्न करावं असं वाटतं' असं विचारलं होतं. यावर त्याने हो तारा आणि मी एकमेकांना अनेक वर्षांपासून ओळखतो, पण आता ती तिच्या बॉयफ्रेंडबरोबर लग्न करत आहे, लवकरच ती विवाहित स्त्री असणार आहे.

तारा शर्माने २००७ मध्ये रुपक सलुजासह लग्न केलं. त्यांच्या लग्नाला अक्षय खन्नाला आमंत्रित करण्यात आलेलं. माध्यमांशी संवाद साधताना ताराला अक्षयला लग्नाला आमंत्रित करण्याबद्दल विचारण्यात आलेलं. त्यावेळी तिने हो, रुपकला अक्षय खूप आवडतो आणि त्याव्यतिरिक्त अक्षय आणि माझं ब्रेकअप खूप पूर्वीच झालंय, पण आम्ही कायम चांगल्या मित्रांसारखेच राहिलो आहोत. सगळं खूप छान सुरू आहे, अशी प्रतिक्रिया दिलेली. तारा शर्माच्या या प्रतिक्रियेमुळे ते दोघे रिलेशनशिपमध्ये होते यावर शिक्कामोर्तब झालेला. अक्षयला त्याला आयुष्याभर अविवाहित राहायचं आहे का याबद्दल विचारल्यानंतर तो म्हणालेला, मला माहीत नाही, मला वाटत नाही असं होईल; पण मला कशा मुलीबरोबर लग्न करायचं आहे याबद्दल माझ्या डोक्यात काही ठाम मत नाहीये. जर मी लग्न केलंच तर तिचे केस काळ्या रंगाचे असायला हवे, डोळे सुंदर असायला हवे असं काहीतरी हवं आणि जर तिला उत्कृष्ट जेवण बनवता येत असेल तर मी तिच्याशी लग्न करेन.



# आता दुसरा पर्याय शोधायला हवा...

अभिनेत्री जिया शंकर वेड सिनेमामुळे प्रसिद्धीझोतात आली होती. जियाने काही मालिका, सिनेमा आणि वेब सीरिजमध्येही काम केलं आहे. 'मेरी हानिकारक बीवी', 'काटेलाल अँड सन्स', 'पिशाचिनी' या मालिकांमध्ये ती झळकली आहे. तर काही साऊथ सिनेमांमध्येही तिने काम केलं आहे. पण गेल्या दोन वर्षांपासून जियाला काम मिळत नाहीये. याबद्दल अभिनेत्रीने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत खंत व्यक्त केली आहे. जियाने काही फोटो शेअर केले आहेत. पोस्टमध्ये ती म्हणते, या आठवणीत पुन्हा रमताना मला जाणवलं की अभिनयाला सुरुवात केल्यापासून इतक्या वर्षांत माझ्यात किती संयम आणि कृतज्ञता आली आहे. इतर कलाकारांप्रमाणेच माझ्याही आयुष्यात चढउतार आले. पण गेली दोन वर्ष माझ्यासाठी कामाच्या दृष्टीने, माझ्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीने कठीण काळ होता. चित्रपट प्रदर्शित होईल याची वाट पाहत होते. पण तेही झालं नाही. कदाचित मी यासाठी बनलेलीच नाही, कदाचित इथपर्यंतच माझा प्रवास असेल, कदाचित अभिनयाव्यतिरिक्त दुसरा पर्याय शोधायला हवा, असे कित्येक विचार मनात येऊन गेले. पण इथपर्यंत पोहोचल्यानंतर एक गोष्ट मला नक्की कळली आहे ती म्हणजे कॅमेऱ्यासमोर उभं राहणं, अभिनय करणं, कुणाच्या तरी कथा सांगणं आणि त्या पात्राला स्वतःमध्ये शोधून व्यक्त करणं याइतकं प्रेम मी कधीच कुणावर किंवा कशावर केलेलं नाही. यामुळे मला आत्मविश्वासापेक्षा जास्त काहीतरी मला मिळालं आहे. ती ६ वर्षांची लाजरी, सतत टीका झालेली, त्रास सहन करणारी मुलगी आज फक्त आनंदी आहे. तिला तिचा अभिमान आहे आणि तिला माहीत आहे की काहीही झालं तरी ती ठीकच असणार आहे, असंही पुढे तिने म्हटलं आहे. जिया पुढे म्हणते, मी स्वतःसाठी लढायला शिकले, स्वतःवर प्रेम करायला, स्वतःचं कौतुक करायला आणि थोडंसं का होईना, स्वतःवर संशय घेणं थांबवायला शिकले. अजून खूप प्रवास करायचा आहे पण मी फक्त आशा करू शकते. जरी इथेच सगळं थांबलं, तरीही मला समाधान आहे की मला जे करायला मनापासून आवडतं, ते करण्याची संधी मला मिळाली. मी कायमच अभिनयावर प्रेम करणारी एक मुलगी असेन.

# सरत्या वर्षात या सेलिब्रिटींनी घेतला अखेरचा निरोप

**२०२५ हे वर्ष जितकं आनंदाचं होतं, तितकंच ते दुःखाचंही ठरलं. या वर्षात अनेक दिग्गज कलाकारांनी जगाचा निरोप घेतला. त्यामुळे २०२५ हे वर्ष सिनेप्रेमींसाठी वेदनादायक ठरलं. या वर्षी चित्रपटसृष्टीने अनेक लोकप्रिय कलाकार गमावले.**



### पंकज धीर

हिंदी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते पंकज धीर यांनी अनेक चित्रपटांतून आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. 'महाभारत' मालिकेतील कर्ण या भूमिकेमुळे ते घराघरांत पोहोचले. १५ ऑक्टोबर रोजी वयाच्या ६८व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

### असरानी



पंकज धीर यांच्या निधनाचं दुःख कमी होत नाही, तोच पाच दिवसांनी दिग्गज अभिनेते गोवर्धन असरानी यांच्या निधनाची बातमी समोर आली. २० ऑक्टोबर रोजी वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते शेवटचे 'इक्कीस' चित्रपटात दिसणार असून हा चित्रपट २५ डिसेंबरला प्रदर्शित होणार आहे.



### सतीश शाह

पंकज धीर आणि असरानी यांच्या निधनानंतर चाहत्यांना आणखी एक धक्का बसला. आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना हसवणारे अभिनेते सतीश शाह यांचे २५ ऑक्टोबर रोजी वयाच्या ७४व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या जाण्याने मनोरंजन विश्वात एक पोकळी निर्माण झाली.



### सुलक्षणा पंडित

सतीश शाह यांच्या निधनानंतर अवघ्या दहा दिवसांतच प्रसिद्ध अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांच्या निधनाचं वृत्त समोर आलं. त्यांच्या निधनाने कुटुंबीय आणि चाहत्यांना मोठा धक्का बसला.



### शेफाली जरीवाला

'कांटा लगा गर्ल' म्हणून ओळख मिळवलेल्या अभिनेत्री शेफाली जरीवालाचं अवघ्या ४२व्या वर्षी निधन झालं. २८ जून रोजी हृदयविकाराच्या झटक्यामुळे तिनं या जगाचा निरोप घेतला. तिच्या या अकाली निधनाने चाहत्यांना मोठा धक्का बसला.



### जरीन खान

सुलक्षणा पंडित यांच्या निधनाच्या दुःखातून बॉलीवूड सावरत असतानाच, दुसऱ्याच दिवशी अभिनेते संजय खान यांच्या पत्नी जरीन खान यांच्या निधनाची बातमी समोर आली. या दुःखद प्रसंगी अनेक बॉलीवूड कलाकार एकत्र आले होते.

### अच्युत पोतदार



'थ्री इडियट्स' आणि 'लगे रहो मुन्नाभाई'सारख्या लोकप्रिय चित्रपटांतून प्रेक्षकांच्या भेटीला आ-लेले ज्येष्ठ अभिनेते अच्युत पोतदार यांचे १८ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या निधनावर मराठीसह अनेक हिंदी कलाकारांनी दुःख व्यक्त केलं होतं.

### धर्मेंद्र



यानंतर काही दिवसांतच संपूर्ण देशाला आणखी एक दुःखद धक्का देणारी बातमी समोर आली. हिंदी सिनेसृष्टीचे 'ही-मॅन' म्हणून ओळखले जाणारे अभिनेते धर्मेंद्र यांचे निधन झाले. निधनापूर्वी त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. अखेर २४ नोव्हेंबर रोजी वयाच्या ८९व्या वर्षी त्यांनी अखेरचा निरोप घेतला.

### ज्योती चांदेकर



ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांनी वयाच्या ६९ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. १६ ऑगस्ट रोजी आलेल्या त्यांच्या निधनाने सर्वांनाच दु;ख अनावर झालं. मराठी अभिनेत्री तेजस्वीनी पंडितच्या त्या आई होत्या. 'ठरलं तरमधील पूर्णा आजी म्हणून त्या विशेष लोकप्रिय होत्या. गेली पाच दशकं त्यांनी प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे.

### प्रिया मराठे



प्रिया मराठेनं वयाच्या अवघ्या ३८व्या वर्षी कर्करोगामुळं जगाचा निरोप घेतला. 'पवित्र रिश्ता'सह अनेक मराठी मालिकांतील तिच्या भूमिका गाजल्या होत्या. ३१ ऑगस्ट रोजी आलेल्या प्रियाच्या निधनानंतर अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला. अशा अनेक दिग्गज कलाकारांनी सरत्या वर्षात जगाचा निरोप घेतला. त्यामुळे कलाक्षेत्राचे नुकसान झाले.

## सतरा वर्षांनंतर येतोय '३ इडियट्स'चा सिक्वेल

बॉलीवूडच्या 'मिस्टर परफेक्शनिस्ट' म्हणजेच आमिर खानच्या अनेक गाजलेल्या चित्रपटांपैकी एक म्हणजे सगळ्यांचा आवडता '३ इडियट्स'. आमिर खानचं नाव घेतलं की, त्याच्या या चित्रपटाचा उल्लेख हमखास केला जातो. '३ इडियट्स'चे अनेक चाहते या चित्रपटाच्या सीक्वेलची वाट पाहत आहेत. काही महिन्यांपूर्वी या चित्रपटाच्या सीक्वेलबद्दलची माहिती देण्यात आली होती. अशातच आता याबद्दल आणखी एक वृत्त आहे.

१७ वर्षांनंतर आमिर खानच्या '३ इडियट्स'चा सीक्वेल येतोय आणि खास गोष्ट म्हणजे या सिनेमातली आमिर खान, करीना कपूर खान, आर. माधवन व शर्मन जोशी हीच स्टारकास्ट या सीक्वेलमध्येही प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. रिपोर्टनुसार, चित्रपटाशी संबंधित एका सूत्राने सांगितलं की,'३ इडियट्स'चा सीक्वेलची स्क्रिप्ट तयार आहे. चित्रपटाच्या शूटिंगबाबतही मोठी माहिती मिळाली आहे की, २०२६ पासून या चित्रपटाचं शूटिंग सुरू होणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, चित्रपटाची स्क्रिप्ट पूर्णपणे तयार आहे आणि संपूर्ण टीम या सीक्वेलसाठी खूप उत्सुक आहे. टीमला विश्वास आहे की, '३ इडियट्स'सारखीच त्याच्या सीक्वेलची कथासुद्धा प्रेक्षकांना आवडेल. पहिल्या चित्रपटाच्या शेवटानंतर १५ वर्षांनी या सीक्वेलची कथा पुढे नेली जाईल. त्यातील प्रत्येक पात्र त्याच्या आयुष्यात वेगवेगळ्या दिशेना गेलेले असेल; पण ते सगळे पुन्हा एका नव्या प्रवासासाठी एकत्र येताना दिसतील. याचा अर्थ असा की, रँचो, फरहान, राजू आणि प्रिया यांची जुनी केमिस्ट्री प्रेक्षकांना पुन्हा एकदा नव्या रूपात पाहायला मिळेल. दरम्यान, '३ इडियट्स' हा चित्रपट २००९ साली प्रदर्शित झाला होता आणि तो आजही एक क्लासिक सिनेमा मानला जातो. या चित्रपटातून शिक्षण व्यवस्थेबद्दलचा एक वेगळा दृष्टिकोन मांडण्यात आला होता. आजही या सिनेमाला प्रेक्षकांकडून तितकाच प्रतिसाद मिळताना दिसतो. अशातच आता सिनेमाचा सीक्वेल येणार आहे, ज्याची सर्व चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत.